# श्रीचक्रधरांचा मानवतावादी विचार

**प्रा.डॉ.सिंधू बाबाराव सोलापुरे**
मराठी विभाग,
श्री. आसारामजी भांडवलदार महाविद्यालय,
देवगाव रंगारी.

समतेच्या चळवळीत महाराष्ट्र हा संपूर्ण देशात नेहमीच आघाडीवर राहिलेला आहे. या चळवळीला महाराष्ट्रात एक मोठी परंपरा आहे. गेल्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये महात्मा ज्योतिबा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, महर्षि कर्वे, प्रिं. गोपाळ गणेश आगरकर आदि समाजसुधारकांनी एक मोठे वैचारिक मंथन घडवून आणले. त्यांनी चालना दिलेल्या चळवळीने महाराष्ट्रामध्ये उदारमतवादाचा एक मोठा प्रभाव पडला. समतेची ही चळवळ पूर्णपणे यशस्वी झाली आहे असे जरी म्हणता येत नसले तरी उदारमतवादाचा महाराष्ट्रावर जेवढा पगडा आहे तेवढा अन्यत्र क्वचितच आढळतो. जातीजातीतील भिन्नतेची तीव्रता, इतर प्रांतापेक्षा विशेषतः उत्तर भारतापेक्षा महाराष्ट्रात निश्चितच कमी आहे.

महाराष्ट्रात समतेची चळवळ प्रथम दलितेवर विचारवंतानीच हाती घेतली. याचा परिणाम असा झाला की, तामिळनाडू प्रमाणे महाराष्ट्रात या चळवळीत फारसे कटूत्व आले नाही. आज या चळवळीत महाराष्ट्रामध्ये दलित आणि दलितेतर विचारवंत खांद्याला खांदा लावून सारख्याच हिरीरीने पुढे जात आहेत. महाराष्ट्राच्या वेगळेपणाचे श्रेय १९ च्या उत्तरार्धातील विचारवंतांना जसे जाते तसेच ते येथील ७०० वर्षांच्या वैचारिक परंपरेलाही जाते. महाराष्ट्रीय संतांनी विषमते विरुद्ध युद्ध पुकारले नसेल पण त्यांनी विषमतेवर आधारलेली समाजव्यवस्था नाकारली आणि समतेचा सतत पुरस्कार केला. संतांनी दिलेल्या शिकवणीमुळे १९ च्या शतकातील समाज सुधारकांसाठी एकभक्कम पाया निर्माण झाला होता. या परंपरेतील अगदी सुरुवातीच्या द्व्यांमध्ये महानुभाव पंथाचे संस्थापक स्वामी श्रीचक्रधर यांना महत्त्वाचे स्थान द्यावे लागेल.

श्रीचक्रधर स्वामी यांना विषमता मान्य नव्हती. ईश्वरावर देवतेची किंवा देवतेवर ईश्वराची कल्पना करण्याचा विकल्प जसा त्याज्य, तसाच जीवभागात श्रेष्ठ- कनिष्ठतेची कल्पना करण्याचाही विकल्प त्याज्य होय असे त्यांचे मत होते. आपल्या शिष्यांना ते सर्व वर्गाच्या घरी भिक्षा मागायला सांगत. अर्थात चातुर्वर्ण्य त्यांना मान्य नव्हते. हा ब्राम्हण म्हणून श्रेष्ठ व तो महार, मांग म्हणून कनिष्ठ अशी विषमता पाळण्याच्या ते

विरुद्ध होते. इतकेच काय पण रजस्वाला स्रीचा विटाळ पाळणेही त्यांना मंजूर नव्हते. स्रीपेक्षा पुरुष श्रेष्ठ, पुरुषाला तेवढा मोक्षाचा अधिकार आहे. खीला नाही इत्यादी मतांच्याही ते विरुद्ध होते. परमेश्वर प्राप्ती करुन घेण्याचा त्यांच्या मते पुरुषाप्रमाणेच स्रीलाही पूर्णाधिकार आहे आणि तो केवळ श्रवण-कीर्तन, भजन-पूजन, जपजाय इत्यादी बाबतीतच नव्हे तर संन्यास ग्रहणाच्या बाबतीतही महानूभव पंचात आजही स्रियांना संन्यास दीक्षा देण्यात येते. श्रीचक्रधर स्वामींची ही मते त्या काळात अत्यंत पुरोगामी होती. त्यांच्या मुळाशी समानतेचे तत्व होते हे यावरुन दिसून येईल.

महाराष्ट्रातील ज्या सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमीवर सर्वसमावेशक समतेचा त्यांना मोठ्या खंबीरपणे पुरस्कार केला तो वाखाणण्यासारख्या आहे.श्रीचक्रधरांच्या निर्वाणाला ७०० वर्षे होऊन गेली आहेत. यादव राजयटीचा तो उतरता काळ होता. कर्मकांड आणि व्रतवैकल्यांनी सारा समाज पोखरला गेला होता. समाजातील उच्च-नीच, गरीब-श्रीमंत, यांच्यातील दरी पराकोटीला पोहोचली होती. "महाराष्ट्राच्या जीवनातील स्थित्यंतरे" या ग्रंथात के, भवानी शंकर पंडित यांनी लिहिले आहे. "यादवांच्या राजवटीत झालेल्या हिंदूच्या अधःपतनाची पाळेमुळे पूर्वी होऊन गेलेल्या राष्ट्रकुटांच्या राजवटीत शोधता येतात. कोणत्याही राष्ट्राचा हास एकाएकी अकल्पित होत नाही. काळाच्या ओघात तो हळूहळू होत असतो."

इ.स. ७५० ते इ. स. १७५ पर्यंत म्हणजे सव्यादोनशे वर्षे महाराष्ट्रावर राष्ट्रकूटांची सत्ता अबाधित होती. या काळात बौद्धमत क्षीण झाले होते. व्रतवैकल्ये बेसुमार वाढली होती. त्यांनी पुराणांचा आधार घेतला होता. मूर्तीपूजेला भलताच उत आला होता. प्रजेचे अथवा राष्ट्राचे रक्षण करण्याऐवजी देवळाचे व मूर्तीचे रक्षण करण्यात ब्राम्हण आपापली सामर्थ्य पणास लावीत होते. तीर्थक्षेत्रे, दानधर्म, पूजाअर्चा यांना कर्मठपणाचे रुप आले होते. अशा पार्श्वभूमीवर श्रीचक्रधरांनी कर्मकांडावर कठोर प्रहार केला. भट-भिक्षुकांनी रुढ केलेले धार्मिक विधी, तीर्थयात्रा, त्यांनी अमान्य केला आणि बुद्धीप्रमाण्यवादाला आपल्या उपदेशात महत्त्वाचे स्थान दिले, महाराष्ट्रभर सतत सुरु असलेल्या आपल्या भ्रमंतीत ते कुठेही मुक्काम करत, कोणाच्याही हातचे अन्न सेवीत आणि समाजातील सर्व घटकांना आपल्या उपदेशांचा लाभ देत.

श्री. प्रभाकर वैद्य या विचारवंत लेखकाने आपल्या 'श्रीचक्रधर' या पुस्तिकेत श्रीचक्रधरांच्या सामाजिक कार्याचे मोठ्या प्रखर शब्दात वर्णन केले आहे. श्री. वैद्य म्हणतात, "सर्व हिंदू आणि ब्राम्हणी देवदेवता, पुराणांतरीच्या सर्व भाकडकथा, व्रतवैल्पे झुगारुन देण्यासही तो मोकळा झाला होता. सहाजिक बडखोरी ब्राम्हणी धर्माच्या, आचार धर्माच्या कर्मकांडाच्या, फार काय, व्यावसायिक भिक्षुकांच्या मुळावरच येणारी होती

पैठणच्या विद्वान ब्रम्हवृंदाच्या प्रतिष्ठेवरच नव्हे तर त्यांच्या व्यवसायावर सुद्धा हा एक प्रकारचा यज्ञघातच होता." श्री. वैद्य पुढे म्हणतात की, चक्रधर आणि त्याचे अनुयायी कोणत्याही प्रकारची अस्पृश्यता, जातपात, शियाशिव मानीत नव्हते. त्यांच्या मध्ये गावातील महार, मांग किया तथाकथित कनिष्ठ जाती जमातीचे खीपुरुष सामील होत असत. त्याचबरोबर थोरा मोठ्यांच्या ब्राम्हणांच्या, मराठ्याच्या अनेक घरातही चक्रधरांना मुक्तद्वार मिळाल्यामुळे हे सर्व उच्चवर्णीया पर्यंतही जाऊन पोहोचले.

यासंबंधी विवेचन करतांना ते आणखी म्हणतात. "प्रस्थापित चातुवर्णीय ब्राम्हण धर्मातील अणि विशेष म्हणजे यादव राज्याचा मुख्य प्रशासक धर्ममार्तंडांचा नेता हेमाद्री पंडित यांच्या "चतुवर्ग चिंतामणी या ग्रंथात" आदेशिलेल्या कोणत्याही धर्मविधी, व्रत वैकल्याचे पालन चक्रधराकडून होत नसे किंबहुना त्यांच्या सर्व उपदेशाचा आणि प्रत्यक्ष आचारणाचा रोख या सर्व धर्मविधींविरुद्ध व व्रतवैकल्यविरुद्ध होता. श्री. वैद्य यांच्यासारख्या लेखकाचे सोडून द्या पण डॉ. मु.ग. पानसे यांच्यासारख्या विद्वान आणि अत्यंत वस्तुवान विवेचन करणाऱ्या संशोधकांनी देखील आपल्या सुप्रसिद्ध अशा यादव कालीन महाराष्ट्र या ग्रंथात म्हटले आहे की, "ब्राम्हण्य आणि कर्मठपणा यांना प्राप्त झालेले अवास्तवच महत्त्व कमी करण्याकडे सर्व नव्या पंथाचा रोख होता. कोणताही भेदभाव न करता या पंथानी लोकांना आपल्या संप्रदायात सामील करुन घेतले तेव्हापासून जाती भेदाची तीव्रता आपोआप कमी होत गेली."

सारांश समाजातील शक्य तेवढ्या आघाड्यांवरील विषमता जमेले तेवढी दूर करुन समता प्रस्थापित करण्याच्या दिशेने उचलले गेलेले एक महत्त्वाचे पाऊल म्हणजे महानुभाव पंथाची स्थापना असे म्हणण्यास हरकत नाही.

आज सातशे वर्षानंतर चक्रधरांच्या कर्तृत्वाच्या यशापयाची वस्तुनिष्ठ मोमांसा आता आपल्याला करणे शक्य आहे. आज पर्यंत तरी या पंथाविषयी अगदी दोन टोकाची मते मांडली गेली असे दिसते. काहीजण या पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर यांना मोठा क्रांतिकारक मानतात, तर याउलट काही जण हा पंथ अगदी भ्रष्ट असल्याचा आरोप करतात. या संदर्भात श्री. रा. चिं ढेरे यांनी आपल्या संत साहित्य आणि लोक साहित्य या ग्रंथात चांगले प्रतिपादन केले आहे. ते लिहितात. यांच्या मधलाही एक अभ्यासकांचा गट आहे. तो म्हणजे या संप्रदायाच्या वाङ्मयाचे वाङ्मयीन दृष्ट्या संशोधन करणाऱ्यांचा पूर्वग्रहरहित अशा ज्ञाननिष्ठेने या पंथाचा शोध घेण्याची प्रक्रिया अजून सुरु व्हायची आहे. त्यावाचून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील काही रिकाम्या जागा तशाच राहून जातील. अशा अभ्यासकांमध्ये आणि संशोधकांमध्ये डॉ. वि.भि. कोलते, डॉ. शं, गो. तुळपुळे, डॉ. अ. ना. देशपांडे, प्रा. गं. बा. सरदार यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

आतापर्यंत पंथाविषयी विद्वानांनी जे लिखाण केले. किंवा वाङ्मयाचे जे संशोधन केले. त्यामुळे यापुढे या पंथाचे जे निरपेक्ष आणि निःपक्षपाती असे मोजमाप व्हायचे आहे. त्यासाठी भरीव असा पाया तयार झाला आहे. असे म्हणायला हरकत नाही. या पायावरच पुढील निष्कर्षाची इमारत उभी करणे योग्य ठरले.

श्रीचक्रधरांनी तात्कालीन समाजात समता प्रस्थापित करण्याची जे यथाशक्ति प्रयत्न केले. त्यांचा तीन अंगांनी विचार करता येईल. १) जातीभेद किंवा वर्णभेद. २)स्त्री-पुरुष भेद आणि ३) गरीब-श्रीमंत यातील भेद. थोडेफार स्थूलमानाने ज्यांना आजच्या भाषेत दलित म्हणता येईल. अशा शूद्र स्रिया आणि गरीब अशा तिन्ही घटकांना चक्रधरांनी चांगलाच दिलासा मिळवून दिला.

ब्राम्हणत्वावर तर या पंथाने बरेच आघात केले. यासंदर्भात श्रीचक्रधरांचे "सर्वाधर्मत्व ब्राम्हणत्व" आणि "आचार्या नरक" हे उद्गार उल्लेखनीय आहेत. वर्णाश्रम व्यवस्थेतून विकृत झालेले जातिधर्म, जातिवाद म्हणजे विकृत ब्राम्हणत्व, जन्मजात ब्राम्हण्यावर श्रीचक्रधरांच्या अनुयायांनी देखील आघात केले. शुद्ध आचारसरणी आणि शुद्ध कर्मांना चक्रधरांनी फार फार महत्त्व दिले उच्च जातीत जन्माला येण्यापेक्षा उच्च दर्जाची कर्मे केव्हाही चांगली. ते सांगतांना ते म्हणतात, "कर्मचांडाळापसि जातिचांडाळ तो चांग" म्हणजे एखाद्या मनुष्य कर्माने वाईट असेल तर त्याच्यापेक्षा हीन जातीत जन्माला आलेला मनुष्य चांगला. त्यांच्या मते जातीगत उच्चनीचता आणि त्यातून उद्भवणारे स्पृश्यास्पृश्य भेद हा मानसिक विकल्प आहे. प्रत्यक्ष आचरण करुन त्यांनी आपला जातीभेदाला पाठिंबा नसल्याचे सिद्ध केले. त्यासंबंधी एक लीळा 'लीळा चरित्र' या ग्रंथात उपलब्ध आहे.

एकदा श्रीचक्रधर जोगेश्वरीच्या मंदिरात आपल्या शिष्यांसह मुक्कामाला होते. रस्त्याने तीन मातंग जात होते. तत्कालीन प्रथेनुसार अत्यंजांना मंदिरात प्रवेश नसल्याने त्यांनी दुरुनच कळसाला नमस्कार केला व जायला लागले. दोघे निघाले पण तिसरा म्हातारा होता, तो मात्र थांबला. त्याचा हट्ट होता की, "मी हे दैवत पाहिलेया विण नये" काही कामानिमित्त बाहेर आलेल्या आउसे बरोबर त्याने आत निरोप पाठविला "आई, गोसावीयापुढे ऐसे सांघा बाहेरी पाईकु एकु असे तो ऐसा म्हणत असे, हे दैवत पाहिलेया वाचून न वचे." हा निरोप स्वामींना कळल्यावर त्यांनी प्रसाद म्हणून एक लाडू पाठविला. पण त्या मातंगाला केवळ प्रसाद नको होता त्याचा आग्रह एकच होता शेवटी त्याचा हट्ट पूर्ण करण्याकरिता स्वतः चक्रधर बाहेर आले, त्याने त्यांच्या पायावर डोके ठेवले. आणि तोच लाडू स्वामींना परत केला. तो लाडू घेऊन ते आत गेले आणि सर्व भक्तांना तो मातंगाचा लाडू प्रसाद म्हणून वाटला. समाजातील सर्व अत्यंजाना जे कधी मिळाले

नाही ते त्यांनी दिले. विकृत रुढीला हादरे द्यायचा त्यांनी संकल्प केला होता, त्यांनी हिंदू धर्माला लागलेला विषमतेचा कलंक धुवून काढण्याचा प्रयत्न केला. समता त्यांनी आपल्या कृतीत उतरवली. अशीच एक लीळा दाकोबा या चांभाराच्या बाबतीत घडलेली आहे. डोमेग्राम येथे स्वामींचा मुक्काम होत. श्रीमंत थाटात त्यांची महापूजा सुरु होती. त्याचवेळी दाकोबा चांभार स्वामींच्या ओढीने पूजासाहित्य घेऊन आला. आतली गर्दी पाहून तो बाहेरच ताटकळत उभा राहिला. स्वामींना बाहेर ताटकळणाऱ्या चांभाराची ओढ लागली. ते पूजा अवसर सोडून उठले व त्याला हाताला धरुन मंदिरात आणले.

दाकोबा चांभार काय किंवा म्हातारा मातंग काय हे केवळ निमित्तमात्र होते. श्रीचक्रधरांना संपूर्ण हीन जातीचा उद्धार अपेक्षित होता. त्यांनी सर्वांगिण समतेच्या पायावर क्रांती उभारली. महाराष्ट्रातील समतेच्या चळवळीला त्यांनी मोठाच हातभार लावला. स्रियांच्या बाबतीत त्यांची वागणूक अतिशय सहानुभूतीपूर्ण आणि विचार अतिशय उदार असे होते. त्यावेळी पुरुष प्रधान जुलमी आणि जाचक अशा कुटुंब व्यवस्थेत पिळून निघालेल्या स्रियांना त्यांचे वागणे म्हणजे वरदानच वाटले असल्यास नवल नाही. त्यावेळी स्त्रियाचे जीवन खरोखरीच हलाखीचे होते. स्वातंत्र्याचा तर पूर्ण अभावच होता, त्यातल्यात्यात विधवा स्त्रिचे तर हाल विचारायलाच नकोत. स्री-पुरुष समतेबद्दलचे स्वामींचे विचार एका लीळेत आलेले आहेत. ते फार मननीय आहेत. लीळा ७५, लीहचरित्र, उत्तरार्ध भाग २ ती लीळाच मुळातून उद्धृत करणे योग्य ठरेल.

एकूदी गोसावीयासि छीननस्थळीवर आसन असे. तवं सारंगपंडित गोसावी याचे या दरिसना आले, तव गोसावीयाते वेताळूनी भवतीया बाइया बैसालिया असत, गोसावी निरुपण करीत असती. ऐसे सारंगपंडित देखिले आणि म्हणितले, कैसिया गुलगुलीया सातशे परवडी बेटाळूनी बैसालिया असत. अवधिया नेऊनि घालिजति तेलंगदेशी, मग आपण असीजे गोसावियाचा संनिधानी, ऐसे पोटी म्हणति, साउमे आले, हे श्रीचक्रधर स्वामींनी जाणले. ते उपरोधाने त्या खियांना म्हणाले, हा गा: पंडितांना दंडवत करा. सारंगपंडितांना उद्देशून श्रीचक्रधर म्हणाले, हा गा तुम्ही ऐसे म्हणा....... धर्मांचिया चाडा सातुसिया परवडी एथ बाईयाचि का नमाविया? हा तुमचा काई जीउ आणि याचिया काई जिउलिया तुमते आन देवो राखता आणि याते आन देवो राखता ऐसे काइ एथ असे.

हे उद्गार त्यांच्या स्री-पुरुष समान अशा दृष्टीकोनावर प्रकाश टाकण्यास पुरेसे आहेत. अनेक रंजल्या गांजल्या दुःखी, कष्टी, समाजाने झिडकारलेल्या स्रीयांवर त्यांनी मायेची पाखर घातली. देवगावच्या एका ब्राम्हणाच्या पाचही मुली विधवा झाल्या होत्या. सगळे लोक त्यांना पंचराडा म्हणून हिणवत. तो ब्राम्हण फार दुःखी झाला. चक्रधरांच्या दर्शनाला तो आला तेव्हा त्यांनी त्याच्या मुलींचा उल्लेख केला, भटो, या तुमचीया

पंचगंगा निकेनी असती आणि तो जळणारा-पोळणारा ब्राम्हण एकदम "नीवाला" शांत झाला एथ आलेयाही प्राणिया जळता जाये, तरि नीवावे तेके? असा सगळ्या दुःखितांना उद्देशून त्यांचा प्रश्न होता.

एका माळिणीला दुर्धर असा जिव्हारोग झाला होता. घरच्या लोकांनी तिला एका देवळात आणून मरत घातली. गोसावियानी तिथे जाऊन तिला जीवदान दिले. शिष्यांकरवी तिची सेवासुश्रुषा करविली. उत्तरार्ध भाग १ लीळा ६०१ श्रीचक्रधराचे गुरु श्रीगोविंदप्रभू हे तर अशा आचारात रेसभर पुढेच होते. एका सामान्य स्रीला, वेश्येला, एकदा पाठीला मोठा व्रण झाला होता. तिचे दुःख अपार होते. त्यांनी तो फोडून तिचे दुःख निरपोनि काढले, त्या स्त्रिच्या हातचे पदार्थ खाऊन दिला धन्य केले.

श्रीचक्रधरांच्या ठिकाणी गरीब श्रीमंत हा भेद मुळीच नव्हता, देव काइ सुवर्ण पुष्पी पूजिताये त्याला एक हदय पुष्पच पुरे, असे त्याचे उद्गार आहेत. आपली गडगंज संपत्ती आणि घरचे ऐश्‍चर्य यांचा क्षणात त्याग करुन कित्येकांनी त्याचे शिष्यत्व पत्करले. त्यांच्या दृष्टीने धन आणि माती याचे मोल सारखेच होते. एकदा लोणार इथे असतांना कानरदेव राजा त्यांच्या दर्शनाला आला आणि त्याने आसूंनी त्यांची पूजा केली तेव्हा राजाचा भाट म्हणाला, "घ्या-घ्या सिंघणाचा कान्हू प्रसन्न झाला" तेव्हा स्वामींनी एकदा मातीकडे पाहिले व एकदा आसूंकडे पाहिले आणि त्या संपत्तीला स्पर्शही न करता ते उठून गेले.

त्यांचे गुरु गोविंदप्रभूचेही वर्तन याहून वेगळे नव्हते. त्यांचे शिष्य म्हाइंभट्ट हे गर्भ श्रीमंत ब्राम्हण होते. एकदा त्यांनी साठ आसूंचे वस्त्र गोविंदप्रभूकरता घेतले व मनात असा विचार केला. मी सदेउ भाग्याचा माझे यसने वस्र, पाटाऊ दुटी ईश्‍वरी प्रवेसन होत असे. बस तेवढ्याने गोंविदप्रभू संतापले. त्यांनी ते एवढे मोलाचे वस्त्र जमिनीवर फेकून दिले. तुमच्या श्रीमंतीचा इथे काय पाड त्याउलट एखाद्या तेलिणीकडे जाऊन लाखाची भाकरी खाणे त्यांना गोड वाटत असे. एका गरीब ब्राम्हणाने अत्यंत भक्तिभावाने त्यांच्या जाण्या येण्याच्या वाटेवर, द्रोणात भिजवून ठेवलेले हरबरे ते प्रेमाने खात.

तात्पर्य, कोणत्याही प्रकारची विषमता चक्रधरांना अमान्य होती. जातिभेदांच्या अनुषंगाने आलेली विषमता ही तर चातुर्वण्याचे एक अविभाज्य अंग होते. जीवा-जीवात श्रेष्ठ-कनिष्ठत्व मानने चक्रधरांच्या मते विकल्प होता. तो त्यांनी त्याज्य मानला. आपल्या शिष्यांना ते सर्वांना भिक्षा मागायला लावत. चातुर्वर्ण्यम् असे ते म्हणत. महारवाडाहोनि धर्म काढावा हे त्यांचे प्रथमपासून मत होते. स्त्री पुरुष श्रेष्ठ पुरुषाला मोक्षचा अधिकार आणि स्त्रीला मात्र नाही असेही त्यांना मान्य नव्हते. स्रियांना दीक्षा

देणे क्रिया अत्यंत पुरोगामित्वयाचे लक्षण मानायला हवी आणि तिच्या मुळाशी समानतेचेच तत्व आहे.

श्रीचक्रधर स्वामी हे महानुभाव पंथीयांना वंदनीय व पूजनीय असलेल्या पंचकृष्णांपैकी एक कृष्ण होत. 'सर्वज्ञ' ह्या परमेश्वर विषयक विशेषणाचा श्रीचक्रधर स्वामींच्या अगदी विशेष नामासारखा उपयोग 'लीलाचरित्र' या आद्य मराठी ग्रंथात पानोंपानी केला आहे. 'ईश्वर पुरुष' अशी त्यांच्या ठिकाणी अनुयायांची तर श्रद्धा होतीच होती पण त्यांच्यावर विषप्रयोग करणाऱ्या ब्रम्हण सानूला देखील श्रीचक्रधर स्वामींच्या ठायी असलेल्या ईश्वरत्वाचा प्रत्यय आला होता. 'अया अया ईश्वर पुरुष होती दृष्टीपुढां वीखहाओचिना' ह्या ब्रम्हसानूच्या उद्गारावरून त्यांचा द्वेषकरणाऱ्या एका विरोधकाच्याही स्वीकृतीवरुन तर श्रीचक्रधर स्वामींच्या ईश्वरीय अवतारावरील श्रद्धा दृढावल्या शिवाय रहात नाही.

"आमचें गोसावी साक्षात् श्रीकष्ण चक्रवर्ति" अशा अनेकांना झालेल्या साक्षात्कारांचे वर्णनही 'लिला चरित्र' देते. द्वापरीचे ते हे गोसावी ऐशी प्रतिति बैसली अशी ही लीलाचरित्राची साक्ष आहे. आमुची द्वारावती हीची आमुचा कन्हैया येथेची भेटला अशी आलेली अनुभूतीही लीलाचरित्र उद्धृत करते म्हणजे त्यांच्या वंदकांनाच नव्हे तर निंदकांना देखील सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी हे ईश्वरी अवतार आहेत हे मान्य होत या परी परमेश्वर श्रीचक्रधरु जीवातें अद्धरती ! (लक्षण स्थळ वरील भाष्यसूत्र ६६) अस लक्षण स्थळ भाष्यकारांनी अद्धरण प्रकरणाचा समारोप करतांना त्या परमेश्वराला भक्तिभावपूर्वक वंदन केलेले आहे. "चैतन्यापर परमेश्वरु तो देव श्रीचक्रधरु सकळ जीवातें रक्षिता हो अद्धरिता हो " अशी नम्र आशंसाही लक्षणस्थळ भाष्य कारांनी त्या अद्धरण व्यसनिया युग पुरुषांकडून केलेली आहे.

**संदर्भ टीपा**

१. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग १ पूर्वार्ध- अ. ना. देशपांडे, व्हिनस प्रकाशन, पुणे. १९६६.
२. प्राचीन मराठी गद्य प्रेरणा आणि परंपरा- श्रीधर रंगनाथ कुलकर्णी, सिंधू पब्लिकेशन, मुंबई. १९७०.
३. महाराष्ट्रातील संत वाङ्मय व जीवन- मुंबई मराठी ग्रंथालय, दादर, मुंबई. १९५२.
४. महाराष्ट्रातील सारस्यत पंपा. वि. का. राजवाडे, भारत इतिहास मंडळ, पुणे. १८३७.
५. महानुभाव पंथ आणि त्याचे वाङ्मय-डॉ. शं. गो. तुळपुळे, व्हिनस प्रकाशन, पुणे. १९७७.